# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२६

-----------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २९ जून, २०२६ / आषाढ ८, १९४८ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य मंत्री** | |
| **(३)** | **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री** | |
| **(४)** | **शालेय शिक्षण मंत्री** | |
| **(५)** | **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** | |
| **(६)** | **पणन, राजशिष्टाचार मंत्री** | |
| **(७)** | **वस्त्रोद्योग मंत्री** | |
| **(८)** | **सहकार मंत्री** | |

-----------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २७**

-----------------------------

### राज्यातील विशेषत: अमरावती जिल्ह्यातील अवैध सावकारीबाबत

**(१) * ३७६०९ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: अमरावती जिल्ह्यात सुमारे २ लाख ३४ हजार १४९ शेतकऱ्यांनी सावकारांकडून कर्ज घेतले असून अनेक शेतकऱ्यांना उच्च व्याजदर, पीक नुकसान व वाढते उत्पादन खर्च या समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात बँकांकडून होणाऱ्या कर्जपुरवठ्यातील अडचणींमुळे अवैध सावकारीचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाला असून संबंधित प्रकरणांमध्ये प्रशासनाकडून प्रभावी कारवाई करण्यात टाळाटाळ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अवैध सावकारीची समस्या केवळ अमरावती जिल्ह्यापुरती मर्यादित नसून राज्यातील इतर जिल्ह्यांमध्येही वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, सततची नापिकी आणि कर्जाचा बोजा यामुळे राज्यातील सामान्य शेतकरी मोठ्या प्रमाणावर कर्जबाजारी झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राष्ट्रीयकृत आणि सहकारी बँकांकडून शेतकऱ्यांना सुलभतेने नवीन पीक कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती “विशेष सवलत” योजना लागू केली आहे काय,
(६) असल्यास, अवैध सावकारीला प्रतिबंध घालण्यासाठी तसेच संबंधित सावकारांविरुद्ध कठोर कारवाई करण्यासह शेतकऱ्यांनी अधिकाधिक प्रमाणात बँका व कायदेशीर वित्तीय संस्थांकडून कर्ज घ्यावे यासाठी

पीककर्ज वितरण सुलभ करणे, कर्ज प्रक्रियेतील अडथळे कमी करणे व जनजागृती मोहिमा राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) हे खरे नाही.

अमरावती जिल्ह्यातील ५७४ परवानाधारक सावकारांनी माहे एप्रिल २०२६ अखेर ४३,९३६ कर्जदारांना रु.५४.६३ लाख (तारण व बिगर तारण) बिगर कृषी कर्ज वाटप केलेले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) पंतप्रधान किसान सन्मान योजनेच्या लाभार्थी शेतकऱ्यांना बँकांकडून किसान क्रेडिट कार्ड सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

सदर सुविधेमध्ये कृषी पुरक व्यवसाय जसे मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन यासाठी स्वतंत्र कर्जमर्यादा मंजुरीबाबत केंद्र शासनाने उपाययोजना केली आहे.
(६) अवैध सावकारीला प्रतिबंध घालण्यासाठी तसेच संबंधित सावकारांविरुध्द कठोर कारवाई करण्यासाठी शासन निर्णय दि.०१/०३/२०१७ अन्वये जिल्हास्तरीय त्रिसदस्यीय प्रशासकीय समिती नेमण्यात आली आहे. तसेच जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा समन्वय समितीच्या माध्यमातून पीक कर्ज मंजुरी व वितरण या कार्यवाहीवर देखरेख ठेवण्यात येत असून वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व माध्यमांच्या व मंडळांच्या शाळांमध्ये मराठी भाषा सक्तीच्या कायद्याची अंमलबजावणी करणेबाबत

**(२) * ३७२८२ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व मंडळांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी भाषा शिकविणे कायद्याने बंधनकारक असतानाही अनेक खाजगी, इंग्रजी माध्यम तसेच केंद्रीय मंडळांच्या शाळांकडून या नियमांचे पालन होत नसल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठी भाषा शिकविण्याच्या सक्तीच्या नियमांचे पालन न करणाऱ्या शाळांच्या व्यवस्थापनांवर रुपये १ लाखांपर्यंत दंड आकारणे, आवश्यक शैक्षणिक अर्हता प्राप्त मराठी विषय शिक्षकांची नियुक्ती बंधनकारक करणे तसेच, नियमांचे पालन न झाल्यास शाळेची मान्यता रद्द करण्याची तरतूद शासनाने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सर्व मंडळांच्या शाळांमध्ये मराठी विषयाच्या अंमलबजावणीची पडताळणी करण्यासाठी तपासणी पथके नियुक्त करून निश्चित कालावधीत अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पडताळणीमध्ये मराठी विषयाची अंमलबजावणी न करणाऱ्या शाळांना नोटिस बजावणे, सुनावणी घेणे, दंड आकारणे अथवा मान्यता रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, मराठी भाषा संवर्धनाच्या दृष्टीने राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी विषयाचे शिक्षण प्रभावीपणे राबविणे, त्याच्या अंमलबजावणीवर नियमित देखरेख ठेवणे व संबंधित नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशतः खरे आहे.
(२) व (३) हे खरे आहे.

राज्यातील सर्व शाळांमध्ये इ.१ ली ते इ.१० वी पर्यंत "मराठी भाषा" हा विषय सक्तीचा असून सदर तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या शाळांना शास्ती करणे/ शाळांची मान्यता काढून घेणेसाठी शासन निर्णय, दि.१७.०४.२०२६ अन्वये कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.
(४) व (५) मराठी भाषा विभागांमार्फत "राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यासाठी आणि तत्संबंधी किंवा तदानुषंगिक तरतूद करण्याकरिता अधिनियम, २०२०" अधिनियमित करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमातील तरतुदींस अनुसरून शासन निर्णय, दि.०१.०६.२०२० अन्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून राज्यातील सर्व शाळांमध्ये इ.१ ली ते इ.१० वी साठी टप्प्याटप्प्याने मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यासाठी निदेश देण्यात आले आहेत. तसेच, सदर शासन निर्णयातील निदेशांचे पालन न केल्यास संबंधित शाळेविरूध्द आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी विभागीय शिक्षण उपसंचालक यांना "सक्षम प्राधिकारी" व शिक्षण संचालक (प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांना "अपिलीय अधिकारी" घोषित करण्यात आले आहे.

"मराठी भाषा" हा विषय सक्तीचा असतानाही अधिनियमातील तरतुदींचे व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांमधील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या शाळांवर कारवाई करणेसाठी, शासन निर्णय, दि.१७.०४.२०२६ अन्वये कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून करण्यात येणार आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विरार (प.) (ता.वसई, जि.पालघर) येथील बंद असलेल्या यश विद्या निकेतन ग्लोबल स्कूलमध्ये आरटीई अंतर्गत प्रवेश दिल्याबाबत

**(३) * ३५१४७ श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विरार (प.) (ता.वसई, जि.पालघर) येथील यश विद्या निकेतन ग्लोबल स्कूल ही शाळा मागील पाच ते सहा वर्षांपासून प्रत्यक्षात बंद असतानाही त्या शाळेमध्ये शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत पालकांनी जिल्हा शिक्षण विभाग व गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे तक्रारी सादर केल्या असूनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने यश विद्या निकेतन ग्लोबल स्कूल तसेच आरटीई प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट असलेल्या इतर शाळांची प्रत्यक्ष स्थिती, मान्यता व कार्यरत स्थितीची पडताळणी करण्यात आली आहे काय तसेच, प्रत्यक्षात बंद असलेल्या शाळांमध्ये आरटीई अंतर्गत प्रवेश देण्यास जबाबदार असलेल्या संबंधित अधिकारी, कर्मचारी व शाळा व्यवस्थापनाविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच, आरटीई प्रवेश प्रक्रियेत अशा प्रकारच्या अनियमितता रोखण्यासाठी तसेच संबंधित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळून त्यांना पर्यायी मान्यताप्राप्त शाळांमध्ये प्रवेश उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) यश विद्यानिकेतन, यशवंतनगर विरार (प.), ता. वसई ही शाळा बंद नसून सदरची शाळा ही संस्थेने शासनाची परवानगी न घेता परस्पर स्थलांतरित केलेली आहे. शिक्षण संचालक (प्राथ.), पुणे यांच्याकडील दिनांक ०८.०५.२०२६ रोजीच्या पत्रान्वये संबंधित शाळेत आरटीई २५ टक्के प्रवेश निश्चित झालेल्या बालकांना त्यांनी ऑनलाईन निवडलेल्या १० शाळांपैकी रिक्त असलेल्या जागेवर प्रवेश देण्याची कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले होते.

तक्रारदार पालकांची शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, पालघर कार्यालयामध्ये सुनावणी घेण्यात आली. पालकांच्या पसंतीनुसार उपलब्ध शाळांमध्ये बालकांना प्रवेश देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

आरटीई २५ टक्के मध्ये क्षेत्रभेटी न करता शाळांची नोंदणी अंतिम केल्याने गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती वसई, संबंधित विस्तार अधिकारी (शिक्षण) व संबंधित केंद्रप्रमुख यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून, त्यानुसार पुढील प्रशासकीय कार्यवाही सुरू आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय शाळांचे सक्षमीकरण करुन पटसंख्या वाढविणेबाबत

**(४) * ३५५३० श्री.अशोकराव माने (बापू) (हातकणंगले), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सरकारी, जिल्हा परिषद, महानगरपालिका व नगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या एका वर्षात सुमारे १ लाख ३० हजार १५७ ने घटल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषद व इतर शासकीय शाळांमध्ये इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या पटसंख्येत सातत्याने घट होत असून पूर्व-प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर खाजगी शाळांनी मोठ्या प्रमाणात वर्चस्व निर्माण केले आहे तसेच स्वयंअर्थसहाय्यित (Self-Finance) शाळांमध्ये सुमारे ७ लाख ८९ हजार ९४४ विद्यार्थ्यांची वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पालकांचा खाजगी शाळांकडे वाढता कल, पूर्व-प्राथमिक शिक्षणातील स्पर्धा, मराठी व इंग्रजी माध्यमाविषयीची पसंती तसेच इतर विविध कारणांमुळे ग्रामीण महाराष्ट्राचा कणा असलेल्या जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांची पटसंख्या घटत असून आगामी काळात कमी पटसंख्येमुळे अनेक शासकीय शाळांच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांची गळती रोखणे, शासकीय व जिल्हा परिषद शाळांमध्ये पूर्व-प्राथमिक शिक्षण अधिक प्रभावीपणे राबविणे, मराठी व इंग्रजी माध्यमाच्या सुविधा उपलब्ध करून देणे, डिजिटल व गुणवत्तापूर्ण शिक्षण, मूलभूत सुविधांचे सक्षमीकरण तसेच ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना शासकीय शिक्षणाकडे आकर्षित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, राज्यातील शासकीय शाळांचे सक्षमीकरण करून पटसंख्या वाढविणे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळणे व सार्वजनिक शिक्षण व्यवस्था अधिक प्रभावी करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

UDISE+ नुसार २०२४-२५ च्या तुलनेत २०२५-२६ मध्ये शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पटसंख्या ७६,४८७ ने कमी झाल्याचे दिसून येते.
(२) अंशत: खरे आहे.

पूर्व प्राथमिक गट शाळांना जोडून असलेल्या जिल्हा परिषदांच्या शाळांची संख्या कमी आहे. तसेच, पूर्व प्राथमिक शिक्षण केंद्रे व खासगी केंद्राची संख्या अधिकची आहे याच केंद्रांना जोडूनच स्वंय-अर्थसहाय्यित इंग्रजी शाळा कार्यरत असून इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये आपल्या पाल्यास शिक्षण देण्याकडे पालकांचा कल वाढत आहे. यामुळे, काही जिल्हयांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये सेमी-इंग्रजी वर्ग सुरू करण्यात आले असून यातून जिल्हा परिषद शाळांचा पट टिकविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.
(४), (५) व (६) शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांची संख्या व पटसंख्या घट ही पालकांचा इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे वाढता कल, शहरी भागाकडे होणारे स्थलांतर, जन्मदर कमी होणे इत्यादी कारणांमुळे दिसून येते.

शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पटसंख्या वाढविण्यासाठी शासनाच्या वतीने मोफत गणवेश, शाळा प्रवेशोत्सव, गुढीपाडवा पट वाढवा अभियान, मोफत पाठ्यपुस्तके, एक जोडी बूट दोन जोड्या पाय मोजे, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना, विद्यार्थ्यांकरिता दुपारचे भोजन यांसारख्या विद्यार्थी हिताच्या अनेक योजना राबविल्या जातात. आदर्श शाळा, पीएमश्री शाळा, शाळांना अध्ययन साहित्य पुरविणे, नियतकालिक मुल्याकंन चाचणी (PAT), शैक्षणिक व्हीडीओ मार्फत शिक्षक प्रशिक्षण, संशोधन विषयक उपक्रम, आनंददायी शनिवार, बालरक्षक प्रशिक्षण, विशेष गरजा असणा-या विदयार्थ्यांसाठी विशेष प्रयत्न, राष्ट्रीय अविष्कार अभियानातंर्गत राज्यातंर्गत व राज्याबाहेरील विविध शैक्षणिक आणि वैज्ञानिक संस्थांना विदयार्थ्याच्या अभ्यासभेटी इ. विविध उपक्रम शासनामार्फत राबविण्यात येत असून विदयार्थी पटसंख्येमध्ये वाढ होण्याकरीता या उपक्रमांची मदत होत आहे.

तसेच, शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांच्या दुरूस्तीसाठी व भौतिक सुविधा विकसित करण्यासाठी पंचायत समिती सेस, जिल्हा परिषद सेस, वित्त आयोगाचा निधी, जिल्हा नियोजन फंड तसेच महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मार्फत वेळोवेळी निधी वितरित केला जातो. महाराष्ट्र शासनामार्फत ४७८ डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा विकसित करण्यात आलेल्या आहेत. याचबरोबर शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये ४१२ आदर्श शाळा विकसित करण्याचे प्रस्तावित आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कासारी मुचकुंदी (ता. लांजा, जि.रत्नागिरी) येथील जलविद्युत प्रकल्पाच्या कामासाठी वॉटर फ्रंट कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड, पुणे या कंपनीशी केलेला करारनामा रद्द करण्याबाबत

**(५) * ३९५२२ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागाकडून चार जलविद्युत प्रकल्पांसाठी चार कंपन्यांबरोबर सामंजस्य करार (MoU) केले असून यामधील कासारी मुचकुंदी (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील १७५० मेगावॅट प्रकल्पाचे काम वॉटर फ्रंट कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड, पुणे या कंपनीला देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वॉटर फ्रंट कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड, पुणे ही अत्यंत वादग्रस्त कंपनी असून येथील कंत्राटदारामार्फत जलसंधारणाच्या कामांमध्ये झालेल्या अनियमिततेची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यासाठी शासनाने दिनांक ५ मार्च, २०२६ रोजीच्या आदेशान्वये "विशेष चौकशी पथक" (एसआयटी) गठीत केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंत्राटदार कंपनीने रत्नागिरी जिल्ह्यातील जलसंधारणाच्या १२ धरण प्रकल्पांची गेली १३ ते १७ वर्षे अपूर्णावस्थेत ठेवलेली कामे, खोटी व बनावट कागदपत्रे जोडून शासनाची केलेली फसवणूक, राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी कंपनीवर दाखल झालेले गुन्हे, लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी या कंपनीला काळ्या यादीत टाकून रत्नागिरी येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे शासनाला दिलेले निर्देश, असे असताना या कंपनीला रत्नागिरी जिल्ह्यातील कासारी मुचकुंदी (ता.लांजा) येथील मोठ्या प्रकल्पाचे काम कोणत्या निकषांच्या आधारावर देण्यात आले आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने वॉटर फ्रंट कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड, पुणे या कंपनीच्या पूर्वइतिहासाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून सदर कंपनीस हजारो कोटींच्या प्रकल्पाचे काम देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच, एसआयटीद्वारे चौकशी सुरु असल्याने या कंपनीबरोबर करण्यात आलेला रत्नागिरी जिल्ह्यातील कासारी मुचकुंदी (ता. लांजा) येथील प्रकल्पाच्या कामाचा करारनामा तात्काळ रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

दि. १५.०७.२०२५ रोजी जलसंपदा विभागाने खालील चार कंपन्यांबरोबर उदंचन जलविद्युत प्रकल्पाचे सर्वेक्षण, अन्वेषण व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता दि. २०.१२.२०२३ च्या धोरणाच्या श्रेणी-२ अंतर्गत जलसंपदा विभागासोबत सामंजस्य करार (MoU) केले आहेत:

- मे.ग्रीनको MH०१ IREP प्रायव्हेट लिमिटेड
- अदानी हायड्रो एनर्जी टेन लिमिटेड
- रिथ्विक कोल्हापूर पीएसपी प्रायव्हेट लिमिटेड
- वॉटरफ्रंट कन्सट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

जलसंपदा विभाग, शासन निर्णय दि. २०.१२.२०२३ व शासन शुद्धिपत्रक दि.३१.०७.२०२४ अन्वये सार्वजनिक खाजगी भागीदारीद्वारे उदंचन जलविद्युत प्रकल्प (PSP) आणि सह:स्थित उदंचन जलविद्युत प्रकल्प सौर / इतर अपारंपारीक संकरित प्रकल्पांच्या विकसनासाठीचे शासन धोरण निर्गमित करण्यात आले आहे. या धोरणांतर्गत वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने कोल्हापूर आणि रत्नागिरी जिल्हयातील कासारी

मुचकुंदी (१७५० मे.वॅ) या प्रस्तावित उदंचन जलविद्युत प्रकल्पाकरिता दि.१५.०७.२०२५ रोजी जलसंपदा विभागासोबत सामंजस्य करार केलेला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मृद व जलसंधारण विभागाने वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन प्रा.लि., पुणे या कंत्राटदारास रत्नागिरी विभागांतर्गत सिंधुदुर्ग जिल्हयात ८ व रत्नागिरी जिल्हयात २ अशा एकूण १० प्रकल्पांच्या कामांचे कार्यारंभ आदेश देण्यात आले असून सदर प्रकल्पांपैकी ०४ प्रकल्प अद्याप सुरु झालेले नाहीत. उर्वरित ०६ प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(अ) मे. वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीने निविदा प्रक्रियेमध्ये खोटी / बनावट कागदपत्रे सादर करुन कामे प्राप्त केल्याबाबत कंपनी तसेच तत्कालीन ०७ संचालकाविरुध्द वैभववाडी पोलीस स्टेशनमध्ये सन २०१७ मध्ये गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर प्रकरण मा. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ट स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कणकवली येथे न्यायप्रविष्ट आहे.

(ब) सदर कंपनीविरुध्द मा. लोकायुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली होती. त्यावर लोकायुक्त यांनी सदर कंपनीवर आवश्यक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुषंगाने सदर कंपनीस महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या कार्यकारी समितीने सदर कंपनीच्या नोंदणीस मान्यता न देणे तसेच महामंडळांतर्गत विदर्भ वगळून उर्वरित प्रदेशामध्ये निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास प्रतिबंध करण्याचे आदेश दिले होते. तथापि, सदर आदेशाविरुध्द कंपनीने न्यायालयात अपील दाखल केली असता मा. उच्च न्यायालयाने याबाबत सक्षम स्तरावर कंपनीस म्हणणे मांडण्याची संधी देवून योग्य तो निर्णय घेण्याचे आदेश दिले होते. त्यास अनुसरुन महामंडळाच्या कार्यकारी समितीने सन २०२२ मध्ये सदर कंपनीचे महामंडळांतर्गत कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

विकासकाला कासारी मुचकुंदी प्रकल्पाचे कोणतेही प्रकल्पाचे बांधकाम देणेत आले नसून शासन धोरण दि.२०.१२.२०२३ व दि.३१.०७.२०२४ (शुद्धीपत्रक) नुसार विकासकाने स्वखर्चाने करावयाच्या उदंचन जलविद्युत प्रकल्पाचे काम सामंजस्य कराराद्वारे देणेत आले आहे.

(४) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचेमार्फत झालेल्या कामांची चौकशी करण्यासाठी मृद व जलसंधारण विभागाच्या दिनांक ०५ मार्च, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये विशेष चौकशी पथक (एसआयटी) गठीत करण्यात आले आहे व सदर चौकशी प्रगतीपथावर आहे.

(५) हे खरे नाही.

कासारी मुचकुंदी (१७५० मे.वॅ) या प्रस्तावित उदंचन जलविद्युत प्रकल्पाबाबत लोक आयुक्त यांनी जलसंपदा विभागास कुठलेही निर्देश दिलेले नाहीत.

जलसंपदा विभागाने निर्गमित केलेल्या दि. २०.१२.२०२३ रोजीच्या धोरणातील तरतुदींनुसार श्रेणी-२ अंतर्गत केंद्रशासन/ केंद्रशासन अंगीकृत उपक्रम/ खाजगी विकासक यांनी शोधलेल्या व प्रस्तावित केलेल्या प्रकल्पांचा समावेश करण्यात आलेला असून सदर प्रकल्प विकासकास सर्वेक्षण, अन्वेषण व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी देण्याचे धोरणात प्रावधान आहे. यास अनुसरुन जलसंपदा विभागाने दि.१५.०७.२०२५ रोजी सदर कंपनीसोबत सामंजस्य करार केलेला आहे. सदर प्रकल्पास केंद्रीय विद्युत प्राधिकरण (CEA) यांची सहमती प्राप्त झाल्यावर तसेच सर्व वैधानिक मान्यता प्राप्त झाल्यानंतरच विकासक प्रकल्प विकासनाची कामे हाती घेईल. कासारी मुचकुंदी उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी संपूर्ण खर्च विकासकामार्फत करण्यात येणार असून जलसंपदा विभागाचा कुठलाही खर्च होणार नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हा परिषदेच्या शाळांमधील बंद केलेले इयत्ता नववी व दहावीचे वर्ग पूर्ववत सुरु करणेबाबत

**(६) * ३३३९५ श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा परिषदेने निधीअभावी ५७ शाळांमधील इयत्ता नववी व दहावीचे वर्ग बंद करण्याचा निर्णय घेतल्यामुळे सुमारे साडेसहा हजाराहून अधिक विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होण्याची तसेच ६८ कंत्राटी शिक्षकांवर बेरोजगारीचे संकट निर्माण झाल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या शिक्षण व ग्रामीण विकास विभागाच्या परवानगीनंतर जिल्हा परिषदेमार्फत संबंधित ५७ शाळांमध्ये इयत्ता नववी व दहावीचे वर्ग सुरू करण्यात आले असतानाही ते बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पालघर जिल्हा हा आदिवासीबहुल जिल्हा असल्याने संबंधित शाळांमधील इयत्ता नववी व दहावीचे वर्ग पूर्ववत सुरू ठेवावेत, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, पालक व नागरिकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

पालघर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, याकरीता पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये इ.९ वी ते इ.१० वी चे वर्ग सुरू करण्यास, शासन निर्णय दि.३१.०७.२०१७ अन्वये अटी व शर्तींच्या अधीन राहून परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार ६० शाळांसाठी आवश्यक १८० शिक्षकांच्या सेवा तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन घेण्यात याव्यात यासाठी माध्यमिक शाळेत शिकविण्यास इच्छूक असलेल्या व माध्यमिक शाळेत शिकवू शकतील अशा प्राथमिक शिक्षकांच्या सेवा घेण्यात याव्यात. तसेच, सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षकांना रुपये ८०००/- इतक्या मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्याचे निर्देश दिले होते.

तसेच, या शाळांकरीता आवश्यक असलेली नियमित पदे वित्त विभागाच्या मान्यतेने यथावकाश निर्माण करण्यात येतील. त्यानंतर नियमित पदावर विहित कार्यपध्दतीने नियमित शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी, असे देखील निर्देश आहेत.

मात्र, जिल्हा परिषद, पालघर यांनी शासनाच्या निर्देशानुसार कार्यवाही न करता कंत्राटी पध्दतीने शिक्षकांची नियुक्ती केली आहे.

(४), (५) व (६) सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून पालघर जिल्हयातील जिल्हा परिषद शाळेमधील इ.९ वी व इ.१० वी चे वर्ग नियमित चालू केले आहेत.

-----------------

## मुंबई आणि उपनगरातील स्वयं-अर्थसहाय्यित शाळांकडून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी (पीएफ) न भरल्याबाबत

**(७) * ३८९४९ श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व उपनगरातील सुमारे ३५० ते ४०० स्वयं-अर्थसहाय्यित शाळांच्या व्यवस्थापनाकडून हजारो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी (पीएफ) खात्यात आवश्यक योगदान जमा करण्यात दुर्लक्ष होत असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विभागातील अनेक शाळांमध्ये २० पेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत असतानाही ‘कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व विविध तरतुदी अधिनियम, १९५२’ नुसार आवश्यक नोंदणी करण्यात आलेली नसल्यामुळे सुमारे १५ ते २० हजार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, निवृत्तीवेतन व विमा संरक्षणापासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी जमा न करणाऱ्या शाळा व्यवस्थापनांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१), (२), (३) व (४) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांचेकडून प्राप्त माहितीनुसार, कर्मचारी भविष्य निधी व विविध तरतुदी अधिनियम, १९५२ (The Employees’ Provident Funds and Miscellaneous Provisions Act, १९५२) च्या कलम १(३) अन्वये, २० किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या कोणत्याही संस्थेला/शाळेला सदर कायद्यांतर्गत नोंदणी करणे बंधनकारक आहे. मुंबई व उपनगरातील स्वयं-अर्थसहाय्यित शाळांच्या व्यवस्थापनांकडून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी (पीएफ) खात्यात आवश्यक योगदान जमा करीत नसल्याबाबत कोणतीही तक्रार विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई या कार्यालयाच्या निदर्शनास आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मंडणगड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील इनामदार पब्लिक स्कूल, शिपोळे वेसवी यांच्या शाळा मान्यता प्रक्रियेतील अनियमिततेबाबत

**(८) * ३९२९७ श्री.संग्राम जगताप (अहिल्यानगर शहर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंडणगड (जि. रत्नागिरी) तालुक्यातील आयडीयल एज्युकेशन ट्रस्ट, पुणे संचलित ‘इनामदार पब्लिक स्कूल’, शिपोळे वेसवी या शाळेस शासनमान्यता मिळविताना सादर करण्यात आलेली जागा व प्रत्यक्ष शाळा सुरू असलेली जागा भिन्न असल्याबाबतची तक्रार शासनाकडे प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थेचे अध्यक्ष श्री. शफी यासीन सय्यद (इनामदार) यांनी शासनमान्यतेसाठी सादर केलेला ३० वर्षांचा भाडेकरार व संबंधित जमिनीबाबत खोटी अथवा दिशाभूल करणारी माहिती सादर करून शासनाची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गटशिक्षणाधिकारी, मंडणगड (जि.रत्नागिरी) यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), रत्नागिरी यांना सादर केलेल्या अहवालात संबंधित शाळेची मान्यता रद्द करण्याची शिफारस दिनांक ४ ऑक्टोबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाची फसवणूक व खोटी माहिती सादर केल्याप्रकरणी संबंधित संस्थाध्यक्ष व इतर जबाबदार व्यक्तींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४), (५) व (६) या प्रकरणी सविस्तर चौकशी करण्यात येत आहे.

-----------------

## भिवंडी (जि. ठाणे) येथील आरटीई अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांकडून जास्तीचे शुल्क आकारल्याबाबत

**(९) * ३४४५७ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि. ठाणे) येथील “श्री.हलारी विसा ओसवाल हायस्कूलमध्ये” शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत २५ टक्के आरक्षित जागेवर प्रवेश निश्चित झालेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांकडून सुमारे रु.५,८०० इतक्या शुल्काची मागणी करण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शुल्क भरल्याशिवाय प्रवेश देण्यात येणार नसल्याची भूमिका शाळा प्रशासनाने घेतल्यामुळे अनेक पात्र विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमांतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांकडून कोणतेही शुल्क आकारू नये असे शासनाचे स्पष्ट निर्देश असतानाही संबंधित शाळेकडून शुल्काची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित शाळा प्रशासन, व्यवस्थापन व जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे अशंत: खरे आहे.

श्री. हलारी विसा ओसवाल इंग्लिश ॲकेडमी, अंजुफाटा या शाळेत आरटीई अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याकडून रूपये ५७०० घेतल्याबाबतची तक्रार पालकानी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेतील शिक्षण विभागाकडे केलेली आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

विद्यार्थ्यांच्या पालकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रशासनाधिकारी, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी यांनी दि. १३.०५.२०२६ रोजीच्या पत्रान्वये संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांना यासंदर्भात खुलासा सादर करण्याचे निदेश दिले होते. त्यानुसार संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांनी दि.१४.०५.२०२६ रोजी असा खुलासा सादर केला आहे की, आरटीई अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांकडून

कोणतेही शुल्क घेतलेले नसून ज्या पाल्यांना अबॅकस गणितीय प्रणाली अभ्यासक्रमाचे शिक्षण घ्यावयाचे आहे केवळ अशाच पालकांकडून त्यांचे स्वच्छेने अबॅकस गणितीय प्रणाली अभ्यासक्रमांचे वार्षिक शुल्क रू. ५७००/- घेण्यात आलेले आहे. तसेच एकही बालक शिक्षण हक्क कायदा (आरटीई) २५ टक्के प्रवेशापासून वंचित राहिलेले नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शासकीय शाळांचे विलीनीकरण करण्याबाबत

**(१०) * ३७३९०  ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून राज्यातील २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शासकीय शाळांचे जवळच्या मोठ्या शाळांमध्ये विलीनीकरण करण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयामुळे दुर्गम, डोंगराळ व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अधिक अंतर प्रवास करावा लागणार असून त्यामुळे विशेषतः मुलींच्या शाळा गळतीचे प्रमाण वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विलीनीकरणामुळे प्रभावित होणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक गळती रोखण्यासाठी त्यांना मोफत वाहतूक सुविधा, प्रवास भत्ता अथवा अन्य सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर विलीनीकरणामुळे रिक्त होणाऱ्या शाळांच्या इमारतींचा वापर, उपलब्ध शैक्षणिक साधनसामग्रीचे व्यवस्थापन तसेच संबंधित शिक्षक व कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(५) असल्यास, ज्या शाळांच्या परिसरात रस्ते, वाहतूक सुविधा अथवा अन्य भौगोलिक अडचणी आहेत अशा शाळांना विलीनीकरण प्रक्रियेतून वगळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) राज्यात, सन २०२५-२६ मध्ये, ६४,४७७ शासकीय व जिल्हापरिषद शाळा कार्यरत असून या शाळांमध्ये सुमारे ४८,८५,४४९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळांपैकी ० ते २० पटसंख्या असलेल्या सुमारे १७,०८० शाळा कार्यान्वित आहेत.

कमी पटसंख्या असलेल्या शाळेमध्ये २ ते ३ वर्ग एकत्रित करून त्यांना शिकवावे लागते आणि त्यामुळे शिक्षणाच्या दर्जावर याचा परिणाम होतो. कमी पटाच्या शाळेमधील विद्यार्थ्यांमध्ये निकोप स्पर्धा, खिलाडू वृत्ती, सांघिक भावना यासारख्या बाबी वृध्दींगत करण्याकरीता राज्यातील कमी पटांच्या शाळांची पुनर्रचना करण्याची शिफारस राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मधील खंड ७ मध्ये करण्यात आली आहे. तथापि, कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद अथवा विलीनीकरण करण्याचा कोणताही निर्णय शासन स्तरावर घेण्यात आलेला नाही. तसेच, यासंदर्भात कोणताही शासन निर्णय/ अधिसूचना/ आदेश निर्गमित करण्यात आलेला नाही.

तसेच, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम-२००९ मधील तरतुदीनुसार प्रत्येक बालकांच्या निवासापासून १ किमी अंतराच्या आत प्राथमिक शाळा व ३ किमी अंतराच्या आत उच्च प्राथमिक शाळा सुविधा उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच उक्त नमूद किलोमीटरच्या आत

प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा उपलब्ध नसल्यास अशा ठिकाणच्या विद्यार्थ्यांना नजीकच्या शाळेत जाण्याकरीता वाहतूक भत्ता देण्यात येतो.

तसेच, शासन निर्णय दि.१५.०३.२०२४ अन्वये, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांचे सक्षमीकरण करणेसाठी आवश्यकतेनुसार इ.१ ली ते ४ थी च्या शाळांना इ.५ वी चा वर्ग व इ.१ ली ते इ.७ वी च्या शाळांना इ.८ वी चा वर्ग व आवश्यक असल्यास माध्यमिकचे वर्ग (इ.९ वी व इ.१० वी) जोडण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार सदर वर्ग जोडण्यास सक्षम प्राधिकारी म्हणून संबंधित जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद/ आयुक्त, महानगरपालिका यांना घोषित करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय सहकारी साखर कारखान्याच्या मागण्यांसंदर्भात

**(११)** * **३८६९२ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारने २० लाख टन साखर निर्यातीला परवानगी दिली असली तरी केवळ ७ लाख टन निर्यातीचे करार झाले असून २.५ लाख टन साखर देशात पडून असल्याने उर्वरित पाच लाखांच्या टन निर्यात संकटामुळे साखर उद्योगाला आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरम्यानच्या काळात मा.मुख्यमंत्री यांच्याशी राज्यातील साखर उद्योगाच्या समस्यांसंदर्भात चर्चा करण्यात येऊन मा.मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली साखर क्षेत्राशी निगडीत शिष्टमंडळ, केंद्रीय सहकार मंत्री यांची भेट घेणार असल्याचे राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघामार्फत दिनांक ८ एप्रिल, २०२६ रोजी वा त्या दरम्यान सांगण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर राष्ट्रीय साखर महासंघामार्फत एमएसपी (MSP) चे दर रुपये ३१ वरुन रुपये ४१ करावेत, इथेनॉल निर्मितीमध्ये साखर उद्योगाचा वाटा वाढवावा, इथेनॉलच्या दरात प्रतिलिटर रुपये ५ ते ७ नी वाढ करावी व ओटीएस योजनेचे (एसडीएफ) बळकटीकरण करावे व त्याअंतर्गत समान व्याजामध्ये किमान ५० टक्के सवलत द्यावी अशा प्रकारच्या मागण्या करण्यात आल्या असल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) केंद्र सरकारने दि. १३ मे, २०२६ च्या अधिसूचनेन्वये साखरेची निर्यात तात्काळ प्रभावाने दि. ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत किंवा पुढील आदेश येईपर्यंत बंदी घालण्यात आली आहे.

(२), (३) व (४) मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील साखर उद्योगाच्या अडचणीसंदर्भात दि. २४/०३/२०२६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये केंद्र शासनाच्या अखत्यारित असणाऱ्या विविध मागण्यांवर चर्चा करण्याकरिता राज्यांचे शिष्टमंडळ केंद्र सरकारला प्रत्यक्ष भेटून चर्चा करण्याचे ठरले होते.

त्यानुसार मा.मुख्यमंत्री महोदयांचे नेतृत्वाखाली नवी दिल्ली येथे मा. केंद्रीय मंत्री (गृह आणि सहकार) यांच्याकडे दि.२७/०५/२०२६ रोजी झालेल्या बैठकीत सहकारी साखर कारखान्याकडील अडचणी विस्तृतपणे मांडल्या असून प्रत्येक अडचणींबाबत केंद्र शासनाकडून लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेणेबाबत मा.केंद्रिय मंत्री (गृह व सहकार) यांनी मान्य केले आहे. अशा प्रकारे कारखान्यातून निर्मित साखरेला MSP दर

वाढविणे, साखर कारखान्यामध्ये उत्पादित इथेनॉलचा दर व कोटा वाढविणे याबाबत केंद्र शासनास विनंती केली असून केंद्र शासनाकडे पाठपुरावा चालू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा शेतमाल साठवणुकीसाठी गोदामे उभारणेबाबत

**(१२) * ३८२८९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यात कापूस बाजारात तेजी येऊन कापसाचे दर रुपये ८५०० वरुन रुपये ९००० प्रति क्विंटल झाले असून किमान आधारभूत किंमतीपेक्षा जास्त भाव कापसाला मिळत असतांनाही वाढत्या दराचा फायदा शेतकऱ्यांऐवजी मोठ-मोठे व्यापारी आणि साठेबाजांना होत असल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आर्थिक अडचण आणि साठवणूकीच्या मर्यादेमुळे बहुसंख्य शेतकऱ्यांनी कापूस दिर्घकाळ साठवून ठेवणे शक्य नसल्यामुळे याआधीच व्यापाऱ्यांना कापूस विक्री केल्यामुळे बाजारात वाढत्या दराचा लाभ शेतकऱ्यांऐवजी व्यापाऱ्यांना होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बाजारात वाढत्या दराचा शेतकऱ्यांना लाभ व्हावा याकरिता, ग्रामीण भागात शेतमाल साठविण्यासाठी गोदामाची उभारणी करण्याकरिता, अर्थिक सहाय्य तसेच कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) व (२) खुल्या बाजारपेठेत कापसाचे दर किमान आधारभूत किंमतीपेक्षा (एम.एस.पी.) कमी झाल्यास कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी केंद्र शासनाद्वारे जाहीर केल्या जाणाऱ्या किमान आधारभूत किंमतीने केंद्र शासनाचा मुख्य अभिकर्ता म्हणून भारतीय कपास निगम लिमिटेड (सी.सी.आय.) यांच्याद्वारे व सीसीआयचे उप-अभिकर्ता म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाद्वारे कापूस खरेदी करण्यात येते.

केंद्र शासनाद्वारे कापूस हंगाम २०२५-२०२६ करीता मध्यम धाग्याच्या कापसाच्या हमी दरात मागील कापूस हंगामाच्या तुलनेत रु.५८९/- प्रति क्विटंल वाढ करुन रु.७७१०/- प्रति क्विटंल हमी दर तर लांब धाग्याच्या कापसाच्या हमी दरात रु.५८९/- प्रति क्विटंल वाढ करुन रु.८११०/- प्रति क्विटंल हमी दर जाहीर करण्यात आले.

किमान आधारभूत किंमतीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, शेतकऱ्यांनी बाजार आवारात आणलेला कापूस किमान आधारभूत किंमतीने खरेदी केला जातो.

कापूस हंगाम २०२५-२०२६ मध्ये सुरळीत आणि अखंड कापूस खरेदीसाठी भारतीय कपास निगमने कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या स्व-नोंदणीसाठी "कपास किसान" हे मोबाईल ॲप विकसित केले आहे. सदर ॲपवर शेतकरी स्व-नोंदणी दि.०१.०९.२०२५ पासून सुरु झाली, नोंदणीकरीताचा अंतिम दि.१६.०१.२०२६ हा होता. ज्या शेतकऱ्यांची सदर ॲपवर नोंदणी झाली आहे अशा शेतकऱ्यांची दि.१५.१०.२०२५ पासून भारतीय कपास निगमकडे कापूस खरेदी सुरू झाली.

कापूस हंगाम २०२५-२०२६ मध्ये सी.सी.आय. ने जळगाव जिल्ह्यात १४ कापूस खरेदी केंद्रे उघडली. सदर कापूस खरेदी केंद्रावर दि.१५.०३.२०२६ अखेर एकूण ६,२७,८१२ क्विंटल कापूस खरेदी सी.सी.आय. मार्फत करण्यात आली आहे.

(३) केंद्र शासनाच्या सहकारीता मंत्रालयामार्फत “जगातील सर्वात मोठा धान्य साठवण प्रकल्प” हा प्रायोगिक तत्वावरील प्रकल्प कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शुल्क नियामक प्राधिकरण कार्यालयातील शुल्क मंजुरी प्रकियेच्या अनियमिततेबाबत

**(१३)** * **३९११७ श्री.महेश शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये शुल्क नियामक प्राधिकरण कार्यालयातील कथित अनियमितता, शुल्क मंजुरी प्रक्रियेतील त्रुटी, प्राप्त तक्रारी व लेखापरीक्षणातील बाबींसंदर्भात झालेल्या लक्षवेधी चर्चेला उत्तर देताना मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी दिनांक ११ मार्च, २०२६ रोजी वा त्यादरम्यान उच्चस्तरीय चौकशी करण्याची घोषणा केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर चौकशी तीन महिन्यांत पूर्ण करण्याचे आश्वासन सभागृहात देण्यात आले तरी चौकशी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शुल्क नियामक प्राधिकरण कार्यालयाविरुद्ध प्राप्त झालेल्या तक्रारी, कथित बेकायदेशीर शुल्कवाढ प्रस्ताव, आर्थिक अनियमितता, लेखापरीक्षणातील आक्षेप, हितसंबंध संघर्ष, प्राप्त फौजदारी प्रकरणे व इतर बाबींची शासनाने स्वतंत्र तथ्य पडताळणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शुल्क मंजुरी प्रक्रियेचा विद्यार्थी, पालक व शासनाच्या शिष्यवृत्ती निधीवर आर्थिक परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन चौकशी अहवाल सार्वजनिक करणे तसेच दोषी आढळणाऱ्या व्यक्तींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) तसेच, शुल्क नियामक प्राधिकरणाने मंजूर केलेल्या शुल्क प्रस्तावांचे पुनर्परीक्षण अथवा नमुना तपासणी, चौकशीचा कार्यकक्ष (Terms of Reference) निश्चित करणे, शुल्क मंजुरी प्रक्रिया, लेखापरीक्षणातील आक्षेप, तक्रारींचे निवारण, प्रशासकीय व आर्थिक जबाबदारी तसेच शासकीय शिष्यवृत्ती निधीवरील होणाऱ्या परिणामाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३), (४), (५) व (६) सन २०२६ च्या प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशनात महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार उपस्थित लक्षवेधी सूचना क्र. २१९७ दि.११.०३.२०२६ रोजी विधानसभेत चर्चेला आली होती.

सदर लक्षवेधी सूचनेच्या चर्चेदरम्यान मा.मंत्री महोदय यांनी शुल्क नियामक प्राधिकरणाचे अध्यक्ष हे सेवानिवृत्त न्यायाधीश असल्याने प्राधिकरणाची चौकशी मा.उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करून करण्यात येईल, असे आश्वासित केले आहे.

सदर समितीवर नियुक्त करावयाच्या मा.उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधिशांची नावे उपलब्ध करुन देण्याची विनंती विधी व न्याय विभागास करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने मा.उच्च न्यायालयाकडून इच्छुकांची नावे उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही विधी व न्याय विभागाकडून सुरु आहे.

-----------------

**मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण विभागाच्या (CDOE) परीक्षांमधील गैरव्यवस्थेबाबत**

**(१४) * ३६३५८ श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नोकरी करत शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या मुंबई विद्यापीठ अंतर्गत दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण विभागाच्या (CDOE) परीक्षांदरम्यान विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयी व मनस्ताप सहन करावा लागल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाच्या कालिना संकुलात परीक्षेसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्राची माहिती वेळेवर उपलब्ध झाली नसल्याची तसेच केंद्रावर पोहोचल्यानंतरही आसन क्रमांकानुसार व्यवस्था करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सकाळी साडेदहा वाजता सुरू होणाऱ्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका प्रत्यक्षात सुमारे ११ वाजता परीक्षा केंद्रावर पोहोचल्यामुळे परीक्षा प्रक्रियेमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करणे, परीक्षा व्यवस्थापन प्रणाली अधिक सक्षम करणे तसेच भविष्यात विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या गैरसोयी होऊ नयेत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

सर्व परीक्षा केंद्रांवर प्रश्नपत्रिका ह्या Digital Exam Paper Delivery System (DEPDS) प्रणालीद्वारे परीक्षेच्या किमान अर्धा ते एक तास अगोदर पाठविण्यात आल्या होत्या.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत मोफत शालेय गणवेश योजनेच्या निधीत वाढ करणेबाबत**

**(१५) * ३२७७२ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत राज्यामध्ये इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत शालेय गणवेश योजना राबविण्यात येत असून सदर योजनेंतर्गत सर्व मुली, अनुसूचित जाती-जमातीतील विद्यार्थी तसेच दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांतील विद्यार्थ्यांना दोन शालेय गणवेश, दोन जोडी बूट व दोन जोडी पायमोजे वितरित करण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत प्रति विद्यार्थ्यास दोन गणवेशासाठी रुपये ६०० तसेच बूट व पायमोज्यांसाठी रुपये १७० इतकी तरतूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीतील वाढत्या दरांमुळे इतक्या कमी निधीत विद्यार्थ्यांना दर्जेदार गणवेश, बूट व पायमोजे उपलब्ध होत नसल्याची तसेच कमी दर्जाचे साहित्य वितरित होत असल्यामुळे प्रति विद्यार्थी निधी वाढविण्याची मागणी पालकांकडून करण्यात येत असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शालेय गणवेश योजनेंतर्गत प्रति विद्यार्थ्यांवरील आर्थिक तरतूद वाढविणे, दर्जेदार साहित्य पुरविणे तसेच निधी वितरण प्रक्रियेत सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) दि.०६ जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रति विद्यार्थ्यांस दोन गणवेशासाठी रु.६००/- तसेच, एक जोडी बुट व दोन जोडी पायमोजे यासाठी रु.१७०/- इतकी रक्कम निश्चित करण्यात आली आहे.

दि.२९ मे, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मोफत गणवेश योजनेत सुधारणा करण्यात आली असून विद्यार्थ्यांना आणखी चांगल्या दर्जाचा गणवेश पुरविण्यासाठी शासनाच्या अनुदानाव्यतिरिक्त शाळा व्यवस्थापन समितीस त्यामध्ये योगदान देता येईल अथवा CSR मधून वाढीव निधी उपलब्ध करण्याबाबत शाळा व्यवस्थापन समित्यांनी प्रयत्न करण्याबाबत निर्देश दिले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना जिल्ह्यासह मराठवाड्यातील राजस्थानी मल्टीस्टेट, ज्ञानराधा मल्टीस्टेट व स्नेहश्री या पतसंस्थांमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१६) * ३५३८२ श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्ह्यासह मराठवाड्यातील राजस्थानी मल्टीस्टेट, ज्ञानराधा मल्टीस्टेट व स्नेहश्री या पतसंस्थांमधील आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात ५ हजारांहून अधिक ठेवीदारांची फसवणूक झाल्याची नोंद शासनाकडे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणांमध्ये सहा बँकांमधील सुमारे १४० कोटी रुपये गोठविण्याची कारवाई संबंधित यंत्रणेमार्फत करण्यात आली आहे तसेच या तिन्ही प्रकरणांमध्ये आर्थिक संस्थांमधील ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम, १९९९ (MPID) अंतर्गत गुन्हे दाखल करून आरोपींची मालमत्ता जप्त करण्याची कार्यवाही सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जप्त मालमत्तेचा लिलाव न्यायालयीन प्रक्रिया व दाव्यांची पडताळणी यामुळे ठेवीदारांना त्यांचे हक्काचे पैसे मिळण्यासाठी तीन ते पाच वर्षांचा कालावधी लागणार असून सदर प्रकरणांमध्ये जप्त मालमत्तेचा कालबद्ध लिलाव आराखडा अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर ठेवीदारांना रक्कम परत देण्यासाठी शासनाने अद्याप विशेष टास्क फोर्स, विशेष न्यायालय किंवा विशेष अधिकारी नियुक्त केलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, महिला बचत गट व गरजू ठेवीदारांना अंतरिम आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने अद्याप कोणताही स्वतंत्र निर्णय घेतलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, राज्यातील मल्टीस्टेट व पतसंस्थांमधील भविष्यातील आर्थिक गैरव्यवहार टाळण्यासाठी विशेष लेखापरिक्षण अभियान अथवा स्वतंत्र नियंत्रण यंत्रणा अद्याप कार्यान्वित करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच, आर्थिक गैरव्यवहार रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

ज्ञानराधा मल्टीस्टेट व राजस्थानी मल्टीस्टेट यामध्ये एम.पी. आय. डी. कायद्यांतर्गत तर स्नेहश्री मल्टीस्टेट यामध्ये भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हे दाखल आहेत. ज्ञानराधा मल्टीस्टेट संदर्भात ८० स्थावर मालमत्ता जप्त केल्या आहेत.

(३) अंशत: खरे आहे.

एम.पी. आय. डी. कायद्यांतर्गत प्राधिकृत अधिकारी यांचेमार्फत सदर प्रकिया राबविली जाते.

(४) अंशत: खरे आहे.

ज्ञानराधा मल्टीस्टेटसंदर्भात शासनाने एम.पी. आय. डी. कायद्यांतर्गत प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती केली आहे.

(५) होय, हे खरे आहे.

(६) हे खरे नाही.

बहुराज्यीय संस्था या केंद्रिय निबंधक यांचे अखत्यारीत येतात. सदर संस्थांबाबत फक्त तपासणी करण्याचे अधिकार सहकार आयुक्त यांना आहेत.

पतसंस्था मधील गैरकारभाराबाबत वेळोवेळी फेरलेखापरिक्षण अथवा चाचणी लेखापरिक्षण केले जाते. तसेच नियामक मंडळामार्फत पतसंस्थांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यात येऊन संस्थांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात येतो.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा कॉपीमुक्त व निकोप वातावरणात पार पाडण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणेबाबत

**(१७) * ३३००१ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बारावीच्या परीक्षेदरम्यान सामूहिक कॉपी व इतर गैरप्रकार घडल्यामुळे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत सुमारे १०० कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परीक्षेदरम्यान विविध परीक्षा केंद्रांवर घडलेल्या गैरप्रकारांप्रकरणी एकूण १५ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये अमरावती विभागातील ८, नागपूर विभागातील ३, छत्रपती संभाजीनगर विभागातील ३ तसेच लातूर विभागातील १ प्रकरणाचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या आकडेवारीनुसार राज्यामध्ये सुमारे १ हजार ४६९ सामूहिक कॉपीची प्रकरणे निदर्शनास आली असून त्यापैकी सर्वाधिक ६५० प्रकरणे अमरावती विभागात व ५०१ प्रकरणे छत्रपती संभाजीनगर विभागात आढळली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, 'कॉपीमुक्त अभियान' राबविण्यात येत असताना तसेच बहुतांश परीक्षा केंद्रांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले असतानाही मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित परीक्षा केंद्रांवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) तसेच, भविष्यात परीक्षा प्रक्रियेची विश्वासार्हता अबाधित ठेवणे, सामूहिक कॉपी व इतर गैरप्रकारांना आळा घालणे, तांत्रिक देखरेख अधिक प्रभावी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय,हे खरे आहे.

यावर्षी पार पडलेल्या इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी बोर्ड परीक्षांमध्ये सामुहीक कॉपी व इतर गैरप्रकार घडल्यामुळे एकुण १०० कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.
(२) हे खरे आहे.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेदरम्यान विविध परीक्षा केंद्रांवर घडलेल्या गैरप्रकारांप्रकरणी एकूण १५ गुन्हे (एफआयआर) दाखल करण्यात आले असून त्यामध्ये अमरावती विभागातील ८, नागपूर विभागातील ३, छत्रपती संभाजीनगर विभागातील ३ तसेच लातूर विभागातील १ प्रकरणाचा समावेश आहे.
(३) हे खरे आहे.
(४), (५) व (६) इयत्ता १० वी व इयत्ता १२ वीच्या बोर्ड परीक्षा कॉपीमुक्त व निकोप वातावरणात होण्यासाठी गतवर्षी प्रमाणे या वर्षी देखिल राज्यात कॉपीमुक्त परीक्षा अभियान राबविण्यात आलेले आहे.

- बोर्ड परीक्षांचे आयोजन गुणवत्ता पूर्ण व सुरक्षित वातावरणात होण्यासाठी तसेच जिल्हास्तरावरील नियंत्रण व समन्वयासाठी दिनांक ९ जानेवारी, २०२६ च्या शासन निर्णयान्वये दक्षता समितींची पुर्नरचना करण्यात आली असून दक्षता समितीचे जबाबदारी व कार्य निश्चित करण्यात आले आहे.
- कॉपीमुक्त परीक्षा अभियानासाठी परीक्षा केंद्रावर निगराणीसाठी जिल्हा दक्षता समिती मार्फत भरारी पथकांची नियुक्ती केली जाते. तसेच सदर पथकाने विविध परीक्षा केंद्रांवर आकस्मिक दौऱ्याचे आयोजन करणे व गैरप्रकार आढळल्यास तात्काळ संबंधितांविरुध्द कार्यवाही करणे अशा सूचना देण्यात आलेले होते.
- जे परीक्षा केंद्र कॉपी प्रकरणाबाबत संवेदनशील आहेत, तेथे बैठे पथक नियुक्त करण्यात आलेली होती. परीक्षा केंद्रावर सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करण्यात आली. परीक्षेशी संबंधित नसलेल्या व्यक्तींना परीक्षा केंद्रावर येण्यास प्रतिबंध करण्यात आले होते.
- उपद्रवी व संवेदनशील केंद्राची माहिती जिल्हाधिकारी यांनी प्राप्त करुन व या केंद्रावर विशेष लक्ष द्यावे तसेच पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात यावा अशा सूचना देण्यात आल्या होत्या.
- अतिसंवेदनशील परीक्षा केंद्रावर तसेच केंद्राभोवताली पोलीस प्रशासनाकडे उपलब्ध असलेल्या "ड्रोन" च्या सहाय्याने निगराणी ठेवण्यात आली होती.
- कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार आढळल्यास जबाबदार व्यक्तिस तात्काळ पोलिस प्रशासनाच्या हवाली करण्यात यावे व त्यांच्यावर Maharashtra Prevention of Malpractices Act १९८२ व भारतीय न्याय संहितेतील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यास कळविण्यात आले होते.
- तसेच माहे जून-जुलै, २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेकरिता भूगोल या विषयासाठी पुणे जिल्ह्यामध्ये प्रायोगिक तत्वावर प्रश्नपत्रिका वितरण प्रणाली तसेच उत्तरपत्रिका स्कॅनिंग व ऑन स्क्रिन मार्किंग सिस्टीम द्वारे तपासण्यात येणार आहेत. त्यामुळे उत्तरपत्रिका तपासणी व निकाल प्रक्रिया गतीने पूर्ण होईल व गैरमार्गाला आळा बसेल.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाशिम जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी 'सिबिल स्कोअर' ची अट सक्तीची करीत असल्याबाबत

**(१८) * ३९८५० श्री.श्याम खोडे (वाशिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना सिबिलची अट लावत असल्याने शेतकऱ्यांना कर्ज मिळत नसल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांनी शेतकऱ्यांना कर्ज देताना सिबिलची अट ठेवू नये असे स्पष्ट निर्देश दिले असतानाही या निर्देशाची अंमलबजावणी बँका करीत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी सिबिलची अट लावत असलेल्या बँकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) नाही, हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) मा. मुख्यमंत्री, महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तरीय बँकर्स कमिटीच्या बैठकीत राज्यातील शेतकऱ्यांना सिबिलची अट न लावता बँकांकडून पिक कर्जवाटप करण्यात यावे अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत.

सिबिल स्कोरच्या आधारावर कृषी कर्ज नाकारल्याचे कोणतेही प्रकरण निदर्शनास आलेले नाही असे अग्रणी जिल्हा व्यवस्थापक, वाशिम यांनी कळविले आहे.

वाशिम जिल्हयातील शेतकऱ्यांना दिनांक १९/०६/२०२६ पर्यंत खालीलप्रमाणे खरीप पीक कर्ज वितरीत करण्यात आले आहे.

| अ. क्र. | बँक तपशिल | सन २०२६-२७ करीता खरीप पीक कर्जवाटप लक्षांक) रक्कम( | दिनांक १९/०६/२०२६ पर्यंत झालेले खरीप पीक कर्जवाटप | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | खाते संख्या | रक्कम | |
| १ | राष्ट्रीयकृत बँका | ४७२३४.०० | ८१३४ | ९८५१.६७ | २०.८६ |
| २ | खाजगी बँका | १०८९०.०० | १०४१ | १९८८.३३ | १८.२६ |
| ३ | महाराष्ट्र ग्रामीण बँक | १४२४३.०० | ४२९२ | ५२०४.०० | ३६.५४ |
| ४ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | ५९५३३.०० | ४१०१० | ४४१४७.३२ | ७४.२० |
| | **एकूण** | **१४७०००.००** | **६०८४६** | **६५२९५.१५** | **४६.४१** |

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाच्या निविदा प्रक्रियेतील अनियमिततेबाबत

**(१९) * ३७६६७ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२१ ते २०२५ या कालावधीत एका विशिष्ट उद्योग समूहातील संलग्न कंपन्यांना राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षामार्फत सुमारे रु.६९९ कोटींची कामे देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उद्योग समूहातील ईड्युस पार्क, स्किल ट्री कन्सल्टिंग, इंडस ईड्यूट्रेन, निटकॉन अल्ट्रोरॅप्रो इन्फ्रास्ट्रक्चर व लीडस्पायर कन्सल्टिंग या एकाच समूहातील विविध कंपन्यांना स्पर्धक म्हणून सहभागी करून इतर कंपन्यांना स्पर्धेबाहेर ठेवण्यात आल्याने निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी अधीसभा सदस्य यांनी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाच्या कामकाजाबाबत यापूर्वी दिनांक २० जानेवारी, २०२३ व दिनांक २७ डिसेंबर, २०२३ रोजी लेखी तक्रारी करण्यात आल्या असतानाही सदर निविदा प्रक्रियेबाबत कोणतीही चौकशी करण्यात आली नसल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आली असून संबंधित तक्रारदाराचीच चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित कंपन्यांविरोधात तक्रारी दाखल असतानाही त्याच उद्योग समूहातील इतर कंपन्यांना पुढील कार्यादेश देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सीईटी परीक्षा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र व पारदर्शक यंत्रणा उभारण्याबाबत तसेच संबंधित कंपन्यांना काळ्या यादीत (Blacklist) टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे नाही.

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षामार्फत, प्रचलित नियमानुसार, सन २०२१ ते २०२५ या कालावधीमध्ये ई-निविदा प्रक्रिया राबवून न्यूनतम ठरलेल्या विविध एकूण नऊ सेवापुरवठादारांना कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

सदर सर्व कंपन्या एकाच समुहाच्या आहेत याची पुष्टी करणारे कोणतेही दस्ताऐवज निर्देशनास आलेले नाहीत.

(२) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी अधीसभा सदस्य यांनी तक्रार केली असल्याची बाब खरी आहे.

तथापि, सन २०२१ ते २०२६ या वर्षांत सीईटी कक्षामार्फत राबविण्यात येणाऱ्या सामायिक परीक्षा, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीया, कामांकरीता विहीत कार्यपद्धतीचा अवलंब करून निविदा प्रक्रीया राबविण्यात आली. प्रत्येक कामाच्या निविदा प्रक्रीयेत न्युनतम ठरलेल्या (L-१) सेवा पुरवठादारास कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

(३), (४) व (५) निविदेतील निकष, अटी व शर्तींचे पालन, संबंधित सेवापुरवठादारांकडून झालेले असल्याने, त्यानुषंगाने, पात्र व न्यूनतम दर स्वीकारणा-या सेवापुरवठादारास सीईटी कक्षामार्फत कार्यादेश देण्यात आलेले आहेत. तक्रारदाराची तक्रार वस्तुस्थितीस धरून नाही. तसेच राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत तक्रारदाराची कोणतीही चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली नाही.

(६) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षांतर्गत कोणतेही उपक्रम, प्रकल्प राबविण्याच्या अनुषंगाने, RFP ची छाननी तांत्रिक समितीमार्फत केली जाते. सीईटी कक्षांतर्गत निविदा अनुषंगिक कार्यवाही पारदर्शक पध्दतीने पार पाडली

जाते. सीईटी कक्षाची कामे हाताळणा-या कंपन्यांनी त्या कामासंबंधी गैरप्रकार केल्याची कोणतीही बाब कक्षाच्या निदर्शनास आलेली नसल्याने, कंपन्यांना काळया यादीत टाकण्याचा प्रश्न उद्धवला नाही.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना 'किसान क्रेडिट कार्ड' चे वाटप करण्याबाबत

**(२०)** * **३६७७३ श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने माहे ऑगस्ट, १९९८ मध्ये 'किसान क्रेडिट कार्ड' योजना सुरू केली असून राज्यात २७ वर्षांचा कालावधी उलटूनही ९ लाखांपेक्षा अधिक शेतकरी या कार्डच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने राज्यातील १० लाख शेतकऱ्यांना हे कार्ड देण्याचे उद्दिष्ट निश्चित केले असताना, प्रत्यक्षात ६६,१६५ शेतकऱ्यांनाच कार्ड मिळाले असून ९,३३,८३५ शेतकरी अद्यापही या कार्डपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत शेतकऱ्यांना वार्षिक ४ टक्के व्याजदराने रुपये ५ लाखांपर्यंत सुलभ कर्ज मिळण्याची सुविधा असताना तसेच, अर्ज केल्यानंतर १५ दिवसांच्या आत कार्ड देणे आवश्यक असताना पुणे (३,०७,०००) आणि नाशिक (२,९३,०००) यासारखे मोठे उद्दिष्ट असलेल्या विभागांमध्येही कार्ड वाटपाची प्रक्रिया संथगतीने सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तारणविरहित कर्जासाठी कोणतीही मालमत्ता तारण न ठेवता केवळ (Aadhaar Redacted) मतदार ओळखपत्र व जमिनीची कागदपत्रे बँकेकडे देऊनही शेतकऱ्यांना कार्ड मिळत नसल्यामुळे त्यांना तातडीच्या कर्जासाठी मार्ग उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने राज्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्डचे तात्काळ वाटप करून त्यांना आर्थिक दिलासा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१), (२), व (३) हे खरे नाही.
(४) व (५) शेतकऱ्यांना पीक कर्ज, मत्स्यव्यवसायासाठी कर्ज, त्याचप्रमाणे पशुसंवर्धनासाठी खेळते भांडवली कर्ज सुलभतेने उपलब्ध होण्यासाठी केंद्र शासनाने किसान क्रेडिट कार्ड योजना अंमलात आणली आहे. केंद्र शासनाच्या सुचनेनुसार पंतप्रधान किसान सन्मान योजनेचे लाभार्थी असलेल्या शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड व त्याअंतर्गत कर्जपुरवठा करण्यात येतो.

माहे डिसेंबर २०२५ अखेर राज्यात ९०.९४ लाख पंतप्रधान किसान सन्मान योजनेचे लाभार्थी असुन राज्यातील ८७.५९ लाख शेतकऱ्यांना बँकांमार्फत किसान क्रेडिट कार्ड उपलब्ध करुन देण्यात आले असून ३.३५ लाख लाभार्थ्यांना किसान क्रेडिट कार्ड सुविधा देणे बाकी आहे. याबाबत बँकांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे. राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना त्याचप्रमाणे राज्यस्तरीय बँकर्स समिती मार्फत व्यापारी बँकांना सुचना निर्गमित केल्या आहेत. किसान क्रेडिट कार्ड योजनेअंतर्गत संबंधित शेतकऱ्यांची पतमर्यादा त्याच्याकडील लागवडीखालील क्षेत्र, त्यावरील पीक पेरा व संबंधित बँकेच्या कर्जधोरणानुसार पीकनिहाय कर्जदर यावर अवलंबुन आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे सदर पतमर्यादा पाच वर्षासाठी असुन पीक

पेऱ्यामध्ये बदल झाल्यास पतमर्यादा दरवर्षी सुधारित करण्याची तरतुद आहे. किसान क्रेडिट कार्ड अंतर्गत शेतकऱ्यांना पीक कर्ज, मत्स्यव्यवसायासाठी कर्ज, त्याचप्रमाणे पशुसंवर्धनासाठी खेळते भांडवली कर्ज देण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या व्याज परतावा योजनेमुळे पीक कर्जाचा व्याज दर ७% असुन राज्य शासनाच्या व्याज परतावा योजनेमुळे पीक कर्जाचा व्याजदर ६% झाला आहे.

पुणे जिल्हयातील ५,३१,४७१ शेतकऱ्यांकडे किसान क्रेडिट कार्ड सुविधा उपलब्ध आहे. तसेच नाशिक जिल्हयातील ४,२५,५२२ शेतकऱ्यांकडे किसान क्रेडिट कार्ड सुविधा उपलब्ध आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार रु. दोन लाखापर्यंतच्या पीक कर्जासाठी कोणतेही अतिरिक्त अथवा समांतर तारण घेतले जात नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना जमिन धारणेची कागदपत्रे बँकेत सादर केल्यानंतर त्याआधारे पीक कर्ज पुरवठा करण्यात येत आहे. केंद्र शासनाने विकसित केलेल्या जनसमर्थ पोर्टलच्या माध्यमातुन शेतकऱ्यांना ऑनलाईन पध्दतीने पीक कर्जाची मागणी, मंजुरी व वितरण या सुविधा उपलब्ध झालेल्या आहेत.

राज्यातील शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या माध्यमातुन नियमित आढावा घेण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वरोरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना बँकांकडून पीक कर्ज नाकारल्याबाबत**

**(२१) * ३५०३० श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील काही शेतकऱ्यांच्या शेतजमिनी या वर्धा जिल्ह्यात असल्यामुळे "रहिवासी जिल्हा एक आणि शेतीचा जिल्हा दुसरा" असे तांत्रिक कारण पुढे करून संबंधित बँकांकडून सन २०२६ मध्ये पीक कर्ज नाकारण्यात आल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांना मागील अनेक वर्षांपासून नियमितपणे पीक कर्ज मिळत होते, मात्र चालू वर्षात कर्ज नाकारण्यात आल्याने त्यांच्या खरीप हंगामाच्या पेरणीसमोर आर्थिक संकट निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने पीडित शेतकऱ्यांना तातडीने पीक कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) वरोरा, जि. चंद्रपुर तालुक्यातील काही शेतकऱ्यांच्या शेतजमिनी या वर्धा जिल्ह्यात असल्याने रहिवासी जिल्हा व शेतीचा जिल्हा वेगळा असल्याच्या तांत्रिक कारणामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, चंद्रपूर या बँकेकडून सन २०२६ मध्ये पीक कर्ज नाकारण्यात आले आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ नुसार चंद्रपुर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची नोंदणी झाल्याने बँकेच्या मंजूर उपविधीनुसार बँकेचे कार्यक्षेत्र चंद्रपूर जिल्यापुरते मर्यादीत आहे. चंद्रपुर जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत बँकेच्या संलग्न सेवा सहकारी संस्थेमार्फत पिककर्ज मागणी करणाऱ्या शेतकरी

सभासदांना चंद्रपुर जिल्ह्यातील रहिवासी व कार्यक्षेत्रात असलेल्या शेतजमिनीवर पिककर्ज वाटप करण्यात येते.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत जिल्ह्याबाहेरील शेतकरी सभासदांना कर्ज वितरण केल्यास व कर्ज थकीत झाल्यास या कर्ज वसुलीसाठी व कायदेशीर कार्यवाहीसाठी अडचणीचे होते. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या पायलट प्रोजेक्ट अंतर्गत चंद्रपुर जि.म.स. बँकेने ऑनलाईन प्रणालीव्दारे शेतकऱ्यांना तात्काळ पिककर्ज उपलब्ध होणेकरीता कृषी ३६० ऑनलाईन ॲप कार्यान्वीत केले आहे. सदर ॲपचे सॉप्टवेअर प्रणालीमध्ये जिल्ह्यातील शेतजमिन ७/१२ व्यतिरीक्त इतर जिल्ह्यातील ७/१२ दर्शवित नाही. यामुळे तांत्रिकदृष्ट्या बँकेस जिल्ह्याबाहेरील शेतकरी सभासदांना पिककर्ज वितरीत करण्यास तांत्रिक अडचण निर्माण होतात.

सेवा सहकारी संस्था मर्या. नागरी, ता. वरोरा जि. चंद्रपुर या संस्थेने १९ शेतकरी सभासदांना त्यांना इतर बँकेमार्फत कर्ज मिळण्यास अडचण येऊ नये म्हणून, त्यांचे ७/१२ वरील बोजा नोंद कमी करण्याबाबत पत्र दिलेले आहे. तसेच या पात्र सभासदांनी बँक ऑफ इंडिया, शाखा नागरी यांचेकडे पिककर्ज मागणी प्रस्ताव सादर केलेला असून, बँकेकडे पिक कर्ज मागणी केलेल्या शेतकऱ्यांना पिककर्ज मंजुर करण्याबाबत बँक स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कनिष्ठ महाविद्यालये आणि खाजगी कोचिंग क्लासेस यांच्यातील बेकायदेशीर 'इंटिग्रेटेड टाय-अप' (Dummy Schooling) यावर नियंत्रण आणण्यासाठी स्वतंत्र कायदा करणेबाबत**

**(२२) * ३७९६० श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य असताना अनेक विद्यार्थी नियमितपणे महाविद्यालयात उपस्थित न राहता खाजगी कोचिंग क्लासेसमध्ये जात असल्याचे तसेच 'इंटिग्रेटेड टायअप' व 'डमी स्कूलिंग' च्या माध्यमातून कनिष्ठ महाविद्यालये व खाजगी क्लासेस यांच्यातील संगनमताचे प्रकार पुणे, मुंबई व इतर शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात सुरू असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष उपस्थिती सुनिश्चित करण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता, मात्र त्याची प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, खाजगी कोचिंग क्लासेस, इंटिग्रेटेड / डमी स्कूलिंग आणि कनिष्ठ महाविद्यालयांशी असलेल्या संगनमतावर नियंत्रण आणण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्याची घोषणा करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कनिष्ठ महाविद्यालये व खाजगी कोचिंग क्लासेसमधील कथित संगनमत रोखण्यासाठी ७५ टक्के उपस्थितीची अट काटेकोरपणे लागू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच, उक्त नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३), (४) व (५) श्री. सुखदेब सहा यांनी मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे आंध्रप्रदेश सरकार विरोधात दाखल केलेली याचिका प्रकरणी दि.२५.०७.२०२५ आदेशान्वये मा. न्यायालयाने निर्गमित केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने विभागाच्या दि.०७.०१.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील शाळांमध्ये तसेच खाजगी

शिकवणी वर्गामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांवर अतिरिक्त ताण तणाव निर्माण होऊ नये यांकरीता प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्याकरीता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय निरीक्षण समिती स्थापन करण्यात आल्या आहेत तसेच खाजगी शिकवणी वर्गाकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

केंद्र शासनाने दिनांक १६.०१.२०२४ रोजी निर्गमित केलेल्या मागदर्शक सूचना व तसेच देशातील अन्य राज्यांनी खाजगी शिकवणी वर्गाकरीता तयार केलेले अधिनियम/नियम यातील तरतुदी विचारात घेवून राज्यातील खाजगी शिकवणी वर्गाकरीता सर्व समावेशक "खाजगी शिकवणी (विनियमन) अधिनियम, २०२६" तयार करण्याची कार्यवाही विभाग स्तरावर करण्यात येत आहे. तसेच विभागाच्या दि. १५.०६.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व खासगी अनुदानित/ विनाअनुदानित/ अंशत: अनुदानित/ स्वंयअर्थसहाय्यित कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती बायोमेट्रिक पध्दतीने सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने सर्व शाखांच्या कनिष्ठ महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती बायोमेट्रिक पध्दतीने घेण्याबाबतच्या सूचना मा.मंत्री महोदय यांनी दिल्या आहेत.

-----------------

**महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समितीकडून ग्रंथ प्रकाशनातील विलंबाबाबत**

**(२३) * ३७२८७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी वर्षास दिनांक ११ एप्रिलपासून प्रारंभ होत असताना 'महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती'कडून मागील सलग तीन वर्षांमध्ये एकही नवीन ग्रंथ अथवा पुस्तक प्रकाशित करण्यात आले नसल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीकडे उपलब्ध असलेले पुनर्मुद्रणासाठी तयार साहित्य, संशोधनपर लेखन, संपादित ग्रंथ व अन्य दस्तऐवज छपाई व प्रकाशनासाठी सिद्ध असूनही त्यांचे मुद्रण व प्रकाशन होऊ शकलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील तीन वर्षांमध्ये एकही नवीन पुस्तक प्रकाशित झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, समितीकडे उपलब्ध असलेले अप्रकाशित साहित्य, संशोधनपर लेखन व ऐतिहासिक दस्तऐवजांचे प्रकाशन करण्यासाठी तसेच महात्मा फुले यांच्या साहित्याचे डिजिटलायझेशन, ई-लायब्ररी निर्मिती व विविध भारतीय व परदेशी भाषांमध्ये अनुवाद करण्याबाबत शासन विचारधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षाचे औचित्य साधून सदर ग्रंथ प्रकाशन, डिजिटलायझेशन व संशोधन प्रकल्पांसाठी विशेष निधी उपलब्ध करून देणे तसेच त्यासाठी कालबद्ध कार्यक्रम जाहीर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समितीने महात्मा फुले समग्र वाड:मय व सावित्रीबाई फुले समग्र वाड:मय या साहित्य ग्रंथाचे प्रत्येकी दोन हजार प्रतींचे पुनर्मुद्रण करुन या ग्रंथाचे दिनांक ११.०४.२०२५ रोजी प्रकाशन केले आहे. तसेच, या ग्रंथाच्या प्रत्येकी एक हजार प्रतींचे पुनर्मुद्रण करण्याचे व्यवस्थापक, शासकीय फोटो झिंको मुद्रणालय, पुणे यांना संचालक, उच्च शिक्षण पुणे यांच्या दिनांक १२.०४.२०२६ रोजीच्या पत्रान्वये निर्देशित करण्यात आले आहे.

(३) हे खरे आहे.

मागील तीन वर्षात नवीन ग्रंथ प्रकाशित झालेला नाही. तथापि महात्मा फुले समग्र वाङ:मय व सावित्रीबाई फुले समग्र वाङ:मय या साहित्य ग्रंथाचे प्रत्येकी दोन हजार प्रतींचे पुनर्मुद्रण करुन हे ग्रंथ विक्रीस उपलब्ध करण्यात आले आहे.

(४) हे खरे आहे.

सदर बाब महात्मा ज्योतिराव फुले चरित्र साधने प्रकाशन समितीच्या विचाराधीन आहे.

(५) महात्मा ज्योतिराव फुले चरित्र साधने प्रकाशन समितीसह इतर ६ थोर महापुरुषांच्या चरित्र साधने प्रकाशन समित्यांद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या साहित्यांच्या प्रकाशनासाठी सन २०२६-२७ या वर्षामध्ये रु.२.५८ कोटी एवढा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**धर्माबाद (जि.नांदेड) येथील युनायटेड स्पिरिट्स या कंपनीकडून पाणीपट्टी आकारणी केल्याबाबत**

**(२४) * ३८६९४ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यातील बाभळी बंधाऱ्याच्या लाभ क्षेत्रातून युनायटेड स्पिरिट्स या कंपनीला पाटबंधारे विभागाकडून मद्याची निर्मितीकरिता पाणीपुरवठा केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीकडून औद्योगिक दरानुसार पाणी आकारणी करण्यात येऊन कंपनीकडून त्यासाठी रुपये ६६ कोटी इतकी अनामत रक्कम घेण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीने केलेल्या मागणीनुसार उक्त रक्कम परत मिळण्याबाबत शासनाने "निरी" या शासनाच्या संस्थेची रुपये १७ लाख इतकी रक्कम देऊन देखील निवड केली असतांना सदर संस्थेने कराची रक्कम कमी दाखविल्याचे निदर्शनास आल्यावर सदर रक्कम (रु.६६ कोटी) शासनाकडून कंपनीस परत करावी लागली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांसह दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.

युनायटेड स्पिरीट्स मर्या.बाळापूर ही कंपनी धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यातील बाभळी बंधाऱ्याच्या खालील बाजूला अधिसुचीत गोदावरी नदीमधून IMFL (Indian Made Foreign Liquor) निर्मीतीसाठी पाणी घेते.

(२) अंशत: खरे आहे.

सदर कंपनीकडून महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांनी निर्धारित केलेल्या दरानुसार पाणीपट्टी आकारणी केली आहे. कंपनीकडून त्यापोटी रुपये ६६.५० कोटी इतकी रक्कम शासन महसुलात जमा केली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील ‘स्टेप’ (STEP) उपक्रमांतर्गत झालेली अनियमितता व निधीच्या उपलब्धतेबाबत

**(२५) * ३३०२९ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १३२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (ITI) राबविण्यात येत असलेल्या अल्पमुदती ‘स्टेप’ (STEP) अभ्यासक्रमांतर्गत संस्थाबाह्य उमेदवारांची नोंदणी करणे अनिवार्य असताना अनेक संस्थांमध्ये केवळ उद्दिष्टपूर्तीसाठी ‘डमी’ उमेदवारांचा (संस्थेतीलच नियमित शिकाऊ उमेदवारांचा) भरणा करण्यात आल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात ‘स्टेप’ उपक्रमांतर्गत प्रशिक्षण, यंत्रसामग्री व फर्निचर खरेदीकरिता शासनाने रुपये २ कोटी ४० लाख २४ हजार इतक्या निधीस प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, एकीकडे ‘स्टेप’ उपक्रमासाठी निधीची उपलब्धता असताना दुसरीकडे संस्थांमधील नियमित प्रशिक्षणाकरिता आवश्यक असणाऱ्या कच्च्या मालाच्या (Raw Material) खरेदीसाठी निधीची कमतरता भासत असल्याने विद्यार्थ्यांच्या नियमित प्रशिक्षणावर याचा प्रतिकूल परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ‘स्टेप’ उपक्रमातील या अनियमिततेची उच्चस्तरीय चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच, नियमित प्रशिक्षणाकरिता तातडीने निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही.

शिल्प कारागिर प्रशिक्षण योजनांतर्गत प्रशिक्षण घेत असलेल्या सर्व प्रशिक्षणार्थ्यांना त्यांची रोजगार व स्वंयरोजगार क्षमता वृध्दींगत होण्यासाठी अल्प कालावधीचे अभ्यासक्रम घेण्याचे आवाहन प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली यांनी त्यांच्या दि.१.९.२०२२ च्या पत्रान्वये केले आहे.

त्यानुषंगाने महाराज्य राज्य कौशल्य शिक्षण व प्रशिक्षण मंडळाने सादर केलेल्या प्रस्तावास अनुलक्षून, राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तांत्रिक विद्यालयांमध्ये अल्प कालावधीचे अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाने दि.१७.९.२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील नियमित प्रशिक्षणार्थ्यांनी अल्पकालीन अभ्यासक्रम पूर्ण केल्यास त्यांच्या कौशल्यात वाढ होऊन, त्यांच्या रोजगार व स्वंयरोजगाराच्या संधीमध्ये वाढ होणार आहे.

(२) हे खरे आहे.

(३) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील नियमित शिल्प कारागिर प्रशिक्षणाकरीता सन २०२५-२६ या वित्तिय वर्षातील अर्थसंकल्पिय तरतूदीमधून रु.१६.२२ कोटी एवढा निधी खर्च झाला आहे.

अल्पकालीन अभ्यासक्रमासाठी सन २०२६-२७ करीता दक्ष प्रकल्पांतर्गत शिक्षक/समन्वयकांचे मानधन, कच्चामाल व कौशल्य चाचणी संबंधी खर्चासाठी रु.१८.९९ कोटी एवढी रक्कम खर्च करण्यास दि.८.५.२०२६ च्या शासन ज्ञापनान्वये प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिली आहे.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांच्या नियमित दीर्घकालीन प्रशिक्षणासाठी कच्चा मालाकरीता पुरेशी तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील नियमित प्रशिक्षणावर कोणताही प्रतिकुल परिणाम दिसून आलेला नाही. तसेच सदरहू अल्पकालीन अभ्यासक्रम न्यू एज कोर्सेसही सुरु

करण्यात आलेले आहेत. जसे की, ई.व्ही., सोलार, ड्रोन इत्यादी तसेच महिलांसाठी विशेष बॅचेस् यामुळे प्रशिक्षणार्थ्यांच्या रोजगारांच्या संधीमध्ये वाढ होणार आहे.

(४) उपरोक्त नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्यात येत असल्यामुळे यासंदर्भात कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

सन २०२६-२७ या वित्तिय वर्षात औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील नियमित प्रशिक्षणाच्या कच्च्या मालासाठी रु.१९.९७ कोटी इतकी अर्थसंकल्पित तरतूद करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीत होणाऱ्या सेस गळतीवर परिणामकारक उपाययोजना करण्याबाबत

**(२६) * ३७६६८ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतमालाची आवक नोंद विक्री व्यवहार आणि सेस वसुली यावर शंभर टक्के नियंत्रण नसल्याची कबुली कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांनी दिलेल्या पत्रकार परिषदेतून दिनांक २८ एप्रिल, २०२६ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीतील भाजीपाला विभाग, गूळ भुसार विभाग, शेतमाल व भुसार बाजारात गाड्यांच्या प्रमाणात तोडणाऱ्यांची संख्या अत्यल्प असल्याने पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवक नोंद व्यवस्थेत बेबंदशाही कारभारामुळे कोट्यवधींची सेस गळती होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ठराविक कर्मचाऱ्यांकडे अनेक वर्षांपासून एकाच विभागाचा कारभार असल्याने सेस गळतीचा गैरव्यवहार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बाजार समितीत शेतमाल आवक नोंद विक्री व्यवहार प्रक्रीयेवर कोणाचेच नियंत्रण नसल्याने अडते आणि व्यापारी देखील तेवढाच सेस वसूल करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने पुणे बाजार समितीतील कोट्यवधींच्या सेस गळतीवर परिणामकारक उपाययोजना करण्याकरिता शासनस्तरावर मार्गदर्शक धोरण (एसओपी) तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) अंशत: खरे आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे उत्पन्न हे बाजारभावावर अवलंबून असते. आवक वाढूनही बाजारभावामध्ये घट झाल्यास बाजार समितीच्या सेसमध्ये घट होते. सन २०२५-२६ मध्ये बाजार समिती पुणे येथे कांदा, बटाटा, लसुण या शेतीमालास भाव न मिळाल्यामुळे बाजार फीचे उत्पन्न ५ ते ६ कोटीने कमी झाले असून बाजार समितीस आर्थिकदृष्ट्या मोठा फटका बसल्याचे पत्रकार परिषदेत नमूद केलेले आहे.

(२) हे खरे नाही.

कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणेचे गुळ भुसार विभागामध्ये ७१६ भूखंड आहेत. सदरच्या भुखंडावर अनुज्ञप्तीधारक व्यापारी नियमित व अनियमित शेतीमालाचा व्यवसाय करीत आहेत. बाजार आवारामध्ये आवक झालेल्या शेतीमालाच्या विक्रीची नोंद घेतली जाते. सद्य:स्थितीमध्ये गुळ भुसार बाजार आवारामध्ये विक्रीच्या नोंदी घेण्याकरीता तोलणारांची संख्या १२ असून ती अत्यल्प आहे. तसेच गुळ भुसार बाजार आवारामध्ये पॅकिंग

असलेल्या शेतीमालाची मोठ्या प्रमाणात आवक होत आहे. सदर पॅकिंग मालाची नोंद तोलणाऱ्यांनी घेऊ नये याबाबत व्यापारी संघटनेने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.१२३६८/२०१९ दाखल केलेली आहे. त्यामुळे गुळ भुसार विभागात तोलणार भरती प्रक्रीया करण्यात आलेली नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

बाजार समितीने गुळ भुसार व फळे भाजीपाला विभागामध्ये आवक होणाऱ्या शेतीमालाची संगणकीय नोंद घेणेकरिता मे.स्पिन्डल वर्ल्ड यांना मनुष्यबळ पुरवठा करणे या कामाचा ठेका देण्यात आलेला आहे. संगणकीय नोंदीनुसार आवकीचा ताळमेळ घेवून बाजार समितीमार्फत आडत्याकडून बाजार फीची वसुली केली जाते. बाजार समितीमध्ये कामकाजाच्या दृष्टीने तात्पुरत्या स्वरुपात कर्मचाऱ्यांची आवश्यकतेनुसार वेळोवेळी बदल्या केल्या जातात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सांगोला (जि.सोलापूर) येथील इयत्ता दहावीच्या भूगोल विषयाच्या प्रश्नपत्रिका चोरीला गेल्याबाबत**

**(२७)** * **३८६९६ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला (जि. सोलापूर) येथील सांगोला विद्यामंदिरमध्ये राज्य मंडळाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेतील भूगोल विषयाची परीक्षा दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी होणार असताना त्याच्या आदल्या दिवशी प्रश्नपत्रिका ठेवलेल्या कक्षाचे कुलूप तोडून प्रश्नपत्रिकांचे दोन संच (सुमारे ५० प्रश्नपत्रिका) चोरीला गेल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी एका विद्यार्थ्याला पोलीसांनी ताब्यात घेतले असून त्याने यापूर्वीही प्रश्नपत्रिका चोरीचा प्रयत्न केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परीक्षा केंद्रावरील सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत नसणे, प्रश्नपत्रिकांच्या सुरक्षेमध्ये झालेला हलगर्जीपणा तसेच घटनास्थळी पोलीस बंदोबस्त असतानाही चोरीची घटना घडल्याच्या पार्श्वभूमीवर संबंधित मुख्याध्यापक, गटशिक्षणाधिकारी, पोलीस कर्मचारी व गृहरक्षक यांना निलंबित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भविष्यात प्रश्नपत्रिकांच्या सुरक्षिततेसाठी, परीक्षा केंद्रांवरील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी व अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

पुणे विभागीय मंडळांतर्गत असलेल्या सांगोला विद्यामंदिर सांगोला जि.सोलापूर येथील शाळेमध्ये दि.१८.०३.२०२६ रोजी होणाऱ्या भूगोल या विषयाचे २ संच (५०) प्रश्न पत्रिका दि.१६.०३.२०२६ रोजी चोरीला गेल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी एका विद्यार्थ्याला पोलीसांनी ताब्यात घेतले आहे.

(३) अंशत: हे खरे आहे.

सांगोला विद्यामंदिर सांगोला जि.सोलापूर या परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात आलेली होती. तथापि सदर सीसीटीव्ही फक्त परीक्षा सुरु असलेल्या कालावधीतच चालू ठेवून परीक्षा संपल्यानंतर बंद करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.

तसेच, ज्यावेळी कस्टडीचे कुलूप तोडण्याचा व आतील प्रश्न पत्रिका ठेवलेल्या पेटीचे सील तोडून पाकीटे काढण्यात आली, त्यावेळी परिरक्षण स्थळी पोलीस कर्मचारी उपस्थित नसल्याचे आढळुन आले आहे. त्यामुळे पोलीस शिपाई व होमगार्ड यांना निलंबित करण्यात आले आहे व संबधित शाळेचे मुख्याध्यापक परिरक्षक तथा प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांच्या हलगर्जीपणामूळे झालेल्या घटनेबाबत नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला आहे व कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सोलापूर यांना कळविण्यात आले आहे.

(४) इयत्ता १० वी व इयत्ता १२ वीच्या बोर्ड परीक्षा कॉपीमुक्त व निकोप वातावरणात होण्यासाठी गतवर्षी प्रमाणे या वर्षी देखिल राज्यात कॉपीमुक्त परीक्षा अभियान राबविण्यात आलेले आहे.

- बोर्ड परीक्षांचे आयोजन गुणवत्ता पूर्ण व सुरक्षित वातावरणात होण्यासाठी तसेच जिल्हास्तरावरील नियंत्रण व समन्वयासाठी दिनांक ९ जानेवारी २०२६ च्या शासन निर्णयान्वये दक्षता समितींची पुर्नरचना करण्यात आली असून दक्षता समितीचे जबाबदारी व कार्य निश्चित करण्यात आले आहे.
- कॉपीमुक्त परीक्षा अभियानासाठी परीक्षा केंद्रावर निगराणीसाठी जिल्हा दक्षता समिती मार्फत भरारी पथकांची नियुक्ती केली जाते. तसेच सदर पथकाने विविध परीक्षा केंद्रांवर आकस्मिक दौ-याचे आयोजन करणे व गैरप्रकार आढळल्यास तात्काळ संबंधितांविरुध्द कार्यवाही करणे अशा सुचना देण्यात आलेले होते.
- जे परीक्षा केंद्र कॉपी प्रकरणाबाबत संवेदनशील आहेत, तेथे बैठे पथक नियुक्त करण्यात आलेली होती. परीक्षा केंद्रावर सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करण्यात आली. परीक्षेशी संबंधित नसलेल्या व्यक्तींना परीक्षा केंद्रावर येण्यास प्रतिबंध करण्यात आले होते.
- उपद्रवी व संवेदनशील केंद्राची माहिती जिल्हाधिकारी यांनी प्राप्त करुन व या केंद्रावर विशेष लक्ष द्यावे तसेच पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात यावा अश्या सुचना देण्यात आल्या होत्या.

माहे जून-जुलै, २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेकरिता भूगोल या विषयासाठी पुणे जिल्ह्यामध्ये प्रायोगिक तत्त्वावर प्रश्नपत्रिका वितरण प्रणाली (QPDS) तसेच उत्तरपत्रिका स्कॅनिंग व ऑन स्क्रिन मार्किंग सिस्टीम (OSM) द्वारे तपासण्यात येणार आहेत. त्यामुळे उत्तरपत्रिका तपासणी व निकाल प्रक्रिया गतीने पूर्ण होईल व गैरमार्गाला आळा बसणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**

**मुंबई.** **सचिव-१,**

**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.